सोमवार, दि. २० एप्रिल २०२६ • जालना • वर्ष ७ वे • अंक २३० वा • किंमत २ रु. • पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## कर्नाटकच्या शेतकऱ्यांना लुटणारे दोघे ताब्यात

### जालना स्थानिक गुन्हे शाखेची धडाकेबाज कारवाई, २१ लाखांचा मुद्देमाल जप्त

**जालना । प्रतिनिधी -** बियाणे खरेदी-विक्रीच्या बहाण्याने कर्नाटकातील एका शेतकऱ्याला जाळ्यात ओढून, स्वतःची ओळख नामांकित कंपनीचे प्रोडक्शन मॅनेजर म्हणून सांगत तब्बल १७ किलो झेंडूच्या बियाण्यांची जबरी चोरी करणाऱ्या दोन अट्टल आरोपींना जालना स्थानिक गुन्हे शाखेने () बेड्या ठोकल्या आहेत. पोलिसांनी या कारवाईत चोरी गेलेले बियाणे, एक बोलेरो कार आणि मोबाईल असा एकूण २१ लाख ३८ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

कर्नाटक राज्यातील हावेरी जिल्ह्यातील शेतकरी लोकेश देवेंद्रअप्पा इलेगर (वय ४१ वर्षे) हे झेंडूच्या बियाण्यांचा व्यवसाय करतात. आरोपींनी त्यांना जाळ्यात ओढण्यासाठी जालना येथे बियाणे खरेदी करण्याचा बहाणा केला. १८ एप्रिल २०२६ रोजी दुपारी ३:२५ च्या सुमारास लोकेश हे बियाणे घेऊन जालना येथील सेंट मेरी हायस्कूलसमोर पोहोचले.

तेथे दोन अनोळखी तरुण त्यांना भेटले. त्यांनी आपण एका मोठ्या नामांकित कंपनीत प्रोडक्शन मॅनेजर असल्याचे भासवत लोकेश यांचा विश्वास संपादन केला. त्यानंतर, १७ किलो ७०० ग्रॅम वजनाचे झेंडूचे बियाणे (किंमत ७,७८,८०० रुपये) ताब्यात घेतले. आरोपींनी लोकेश यांना ''पैसे देतो'' असे सांगून मोटारसायकलवर बसवले आणि काही अंतरावर नेले. तेथे निर्जन स्थळी त्यांना चालत्या गाडीवरून धक्का देऊन खाली पाडले आणि बियाणे घेऊन पोबारा केला.

या घटनेनंतर लोकेश इलेगर यांनी सदर बाजार पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. घटनेचे गांभीर्य ओळखून पोलीस अधीक्षक अजय कुमार बन्सल यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांना तात्काळ तपासाचे आदेश दिले.

स्थानिक गुन्हे शाखेने तांत्रिक विश्लेषण आणि गुप्त बातमीदारांचे जाळे सक्रिय केले. तपासादरम्यान माहिती मिळाली की, संशयित आरोपी एका काळ्या रंगाच्या बोलेरो कारमधून देऊळगाव राजाकडून जालनाकडे येत आहेत. या माहितीच्या आधारे कन्हैय्यानगर भागात पोलिसांनी सापळा रचला



आणि संशयास्पद बोलेरो अडवून दोघांना ताब्यात घेतले.

आरोपींची ओळख आणि जप्त मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या आरोपींची नावे खालीलप्रमाणे आहेतः सुनील बाबासाहेब जगताप (वय १९ वर्षे, रा. निवडुंगा, ता. जाफ्राबाद, जि. जालना, वैभव पांडुरंग जगताप (वय २३ वर्षे, रा. निवडुंगा, ता. जाफ्राबाद, जि. जालना दोघेही बियाणे खरेदी-विक्रीचा व्यवसाय करतात. अधिक चौकशी केली असता त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. पोलिसांनी त्यांच्याकडून खालील मुद्देमाल जप्त केला आहे.

झेंडू फुलाचे बियाणेः १७ किलो ७०० ग्रॅम (किंमत ७,७८,८०० रुपये), वाहनः गुन्ह्यात वापरलेली काळी बोलेरो कार, इतरः गुन्ह्यात वापरलेले मोबाईल संच असा एकूण किंमतः २१,३८,८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर कारवाई पोलीस अधीक्षक अजय कुमार बन्सल, अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव, सपोनि सचिन खामगळ, पोउपनि राजेंद्र वाघ, अंमलदार सागर बाविस्कर, इरशाद पटेल, देविदास भोजने, आक्रूर धांडगे आणि सौरभ मुळे यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

या कारवाईमुळे आंतरराज्यीय फसवणूक करणाऱ्या टोळ्यांना मोठा धक्का बसला असून, शेतकऱ्यांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्यासाठी निधीची कमतरता पडू देणार नाही - मंत्री संजय शिरसाट

### वडीलासुरा येथे बुद्ध-आंबेडकर-रमाई मूर्तींचे अनावरण



**जालना । प्रतिनिधी -** अंबड तालुक्यातील वडीलासुरा येथे आज सिद्धार्थ बौद्ध विहारात तथागत गौतम बुद्ध, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि माता रमाई यांच्या मूर्तींची प्रतिष्ठापना व अनावरण सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्याचे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री संजय शिरसाट होते, तर उद्घाटक व प्रमुख मार्गदर्शक म्हणून आमदार नारायणराव कुचे उपस्थित होते. पूज्य भंते राजरत्न थेरो यांच्या मार्गदर्शनाखाली विधिवत पूजा करून मान्यवरांच्या हस्ते मूर्तींची प्रतिष्ठापना करण्यात आली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे महत्त्व, सामाजिक समता व शिक्षणाचे मूल्य सांगत, मंत्री संजय शिरसाट म्हणाले, ''महाराष्ट्रात विविध ठिकाणी सामाजिक न्याय विभागांतर्गत विविध विकासाची कामे जोमाने सुरू आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या समर्पित कार्यासाठी निधी कमी पडू देणार नाही, याची मी ग्वाही देतो.''

आमदार नारायण कुचे म्हणाले की, वडीलासुरा येथे उभारण्यात आलेल्या स्मारकाच्या माध्यमातून समता, बंधुता व न्यायाचे विचार समाजात अधिक दृढ होण्यास मदत होईल. तसेच भावी पिढीला प्रेरणा मिळेल. याप्रसंगी कार्यक्रमास नंदकुमार घोडेले, प्राचार्य डॉ. सुनील वाकेकर, माजी सभापती रमेश पैठणे, कपिल सरोदे, साहेबराव पटेकर, यांच्यासह पान २ वर

## विद्यार्थी हेच जीवनाचे शिल्पकार

### उपशिक्षणाधिकारी पुजारी



**दत्ता देशमुख**

**टेंभूर्णी -** १०० शिक्षक क्लब ऑफ जालना तर्फे जयंती महापुरुषांची वाचून साजरी करा या उपक्रमांतर्गत महात्मा जोतीराव फुले यांचे गुलामगिरी व शेतकऱ्यांचा आसूड तर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे माझी आत्मकथा हे पुस्तक समाजातील वाचन इच्छुक नागरिक, शाळा व विद्यार्थ्यांना विविध माध्यमातून वाटप केले जात आहे. ज्यातून महापुरुषांचे जीवन चरित्र घराघरात पोहोचवून महापुरुषांची जयंती नाचून नव्हे तर वाचून साजरी करा हा संदेश देण्यासाठी दि. ११ व १४ एप्रिल रोजी सामान्य ज्ञान परीक्षेचा पहिला टप्पा पार पडला त्यातील विजेत्या विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह व महापुरुषांचे पुस्तक भेट उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक) गिरीश पुजारी, डायटचे जेष्ठ अधिव्याख्याता डॉ. प्रकाश मांटे, प्रा. राजकुमार बुलबुले, प्रा. दत्तात्रय देशमुख , मुअ डॉ. शिवनंदा मेहेत्रे सुभाष पारे व जिल्हा समन्वयक अर्जुन पवार यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. यावेळी हार फुलं देऊन स्वागत करण्याऐवजी पाहुण्यांचे स्वागत पुस्तक भेट देऊन करण्यात आले.याप्रसंगी उपशिक्षणाधिकारी गिरीश पुजारी यांनी विद्यार्थी हेच आपल्या जीवनाचे शिल्पकार आहेत. अशा ज्ञानवर्धक उपक्रमातून व महापुरुषांच्या विचारातून माणुस म्हणून समाजात व पेशात कसे आचारणे असावे हे कळेल तर डॉ. मांटे यांनी पुस्तक घडविते मस्तक,वाचाल तर वाचाल असे संबोधित करून महामानवाच्या कार्याचा आढावा घेतला तसेच पान २ वर

## जालना जिल्ह्यात २१ एप्रिल रोजी यलो अलर्ट

### जिल्हा प्रशासनाकडून नागरिकांना सतर्कतेचा इशारा

**जालना । प्रतिनिधी -** मुंबई येथील प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्राने दिलेल्या सूचनेनुसार, जालना जिल्ह्यात आज १९ एप्रिलआणि २१ एप्रिल २०२६रोजी यलो अलर्ट ( ) जारी करण्यात आला आहे. या कालावधीत जिल्ह्यातील तुरळक ठिकाणी विजेच्या कडकडाटासह वादळी वारा, हलका ते मध्यम पाऊस आणि ताशी ३० ते ४० किमी वेगाने वारे वाहण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

तसेच, २० एप्रिल आणि २२ ते २३ एप्रिल दरम्यानदेखील जिल्ह्यात हलक्या स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता जिल्हा प्रशासनाने वर्तवली आहे. या हवामानातील बदलाच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कार्यालयातील आपत्ती व्यवस्थापन प्रभागार्फे नागरिकांना काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

नागरिकांसाठी महत्त्वाच्या सूचना व दक्षताः

विजेपासून संरक्षणःमेघगर्जना किंवा वीज चमकत असताना झाडाखाली किंवा झाडांजवळ उभे राहू नका. सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा आणि धोकादायक ठिकाणी सेल्फी काढणे टाळावे.

विद्युत उपकरणांचा वापर टाळाः वादळादरम्यान कोणतीही विद्युत उपकरणे वापरू नका. तसेच ट्रॅक्टर, शेतीची अवजारे, मोटारसायकल किंवा सायकल यांपासून दूर राहावे.

मोकळ्या जागेत असल्यासः जर तुम्ही मोकळ्या मैदानात असाल आणि वीज चमकत असेल, तर गुडघ्यावर बसून हाताने कान झाकावेत आणि डोके दोन्ही गुडघ्यांच्या मध्ये ठेवावे जेणेकरून जमिनीशी संपर्क कमीत कमी येईल.

शेतकऱ्यांसाठी आवाहनः अवकाळी पाऊस आणि संभाव्य गारपीटीमुळे शेतीमालाचे नुकसान टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी वेळीच नियोजन करावे.

बाजार समितीमध्ये विक्रीसाठी आणलेला किंवा शेतातील माल सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावा.

जनावरांची काळजीः वीज आणि वादळी वाऱ्यापासून जनावरांचे संरक्षण होईल अशा पान २ वर

## गरिबीवर मात करीत एकाच गावातील दोन वर्गमित्र शासकिय सेवेत

### संदीप काळे, शुभम वानखेडे यांची मुंबई रेल्वे पोलीस भरतीत निवड

**जालना । प्रतिनिधी -** ते म्हणतात ना जीवन जगतांना जीवनात अनेक अडचणी येतात, मात्र त्या अडी-अडचणीवर मात करीत जिद्द चिकाटी आणि परिश्रम करण्याची तयारी असल्यास शिखर गाठता येते याचे ताजे उदाहरण म्हणजे जालना तालुक्यातील नंदापूर येथील संदीप रामदास काळे आणि शुभम संपत वानखेडे हे होय. जिल्हा परिषद शाळेपासून सोबत असलेले दोघे मित्रांनी जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर नशिबाचे फासे कसे उलटवता येतात, याचे जिवंत उदाहरण या दोन तरुणांनी युवा पिढीसमोर एक वेगळा आदर्श ठेवला ठेवत अत्यंत हलाखीच्या परिस्थितीतून संघर्ष करत संदीप काळे आणि शुभम वानखेडे या दोन जिवलग मित्रांची 'महाराष्ट्र लोहमार्ग पोलीस' (चीींलरळ ऋठझ) पदी मजल मारली आहे.

संदिपच्या घरात नेहमी गरीबी, वडील दोन्ही डोळ्यांनी अंध, आई पायाने अपंग असल्याने संदीपच्या वडिलांनी पोटाची खळगी भरण्यासाठी आयुष्यभर रेल्वे गाड्यांमध्ये गाणी गाऊन उदरनिर्वाह करीत आपल्या दोन मुलांचे १२ पर्यंतचे शिक्षण केले तर संदीपने आपल्या आई-वडिलांचे कष्ट हाल अपेष्टा पाहता आपल्याला काम करून घर चालवून आई-वडीलांना सांभाळायचे आहे. शिवाय आपल्या भावाचेही शिक्षण पुर्ण करायचे असल्याने संदीपने आपले पोलीस होण्याचे स्वप्नाला थोडा काळ विराम देत काम करून आई-वडीलांना सांभाळत आपल्या प्रदीप लहान भावाचे शिक्षण पुर्ण केले तर प्रदीपने ही आपल्या भावाच्या कष्टाची जाणीव ठेवत त्याने गेल्या गतवर्षी मुंबई कारागृह पोलीसात मजल मारली, आपला लहान भाऊ शासकिय सेवेत भरती झाल्याने पाहुन संदीपने पुन्हा आपल्या स्वप्नांना गती देत त्याचेही पोलीस होण्याचे स्वप्न त्यांनी प्रत्यक्षात करून दाखवित







ज्या रेल्वेच्या डब्यात वडिलांनी मुलांच्या शिक्षणासाठी कष्ट उपसले, आज त्याच रेल्वेच्या सुरक्षिततेची जबाबदारी संदीप लोहमार्ग पोलीस म्हणून सांभाळणार आहे. तर शुभम चे आई वडील अल्प-भू-धारक शेतकरी असून वडील टेलर काम करतात, तर आई मोलमजूर करून आपल्या कुटूबाचा उदरनिर्वाह करीत असे तर आपल्या मुलाच्या शिक्षणासाठी आई-वडीलांनी अहोरात्र कष्ट करून मुलांना शिक्षण दिले कारण आपली मुले आपल्या कष्टाची जाणीव ठेवून स्वत भविष्य घडवतील तर या मुलांनी आपल्या आई-वडीलांनी केलेल्या कष्टाची जाणीव ठेवत या दोन तरुणांनी जिद्द चिकाटी आणि कठोर परिश्रम करीत आपल्या जीवनात काही तरी करून दाखवायची जिद्द प्रदीप काळे व शुभम वानखेडे या युवकानी रेल्वे पोलीस भरती होण्याचे स्वप्न प्रत्यक्षात साकार केले आहे.

रेल्वेत गाणी गाणाऱ्या पित्याचा आणि टेलरचा मुलगा आता 'खाकी'त! आल्याने आणि एकाच गावातील दोन मित्रांनी महाराष्ट्र लोहमार्ग पोलीस भरतीत मजल मारल्यामुळे नंदापूर गावासह पंचक्रोशीतील नागरिकांनी त्यांचा व त्यांच्या आई-वडीलांचा सत्कार करीत त्यांना शुभेच्छा दिल्या आहे.

### संदीप व शुभमला ॲड.आंबेडकर यांनी दिल्या दुरध्वनीवरून शुभेच्छा

एका छोट्याशा गावातील दोन युवकांनी आपल्या कुशल बुध्दीच्या आणि अफ ाट मेहनतीच्या जोरावर शासकिय सेवेत सामिल होण्याचे यश आपल्या पदरात पाडुन घेतल्याने रिपब्लिकन सेनेचे ॲड. अमन आंबेडकर आणि प्रदेशाध्यक्ष डॉ.सशिल सुर्यवंशी यांनी संदीप काळे आणि शुभम वानखेडे यांना दुरध्वनीवरून शुभेच्छा देत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

### नेत्र तपासणी ला उत्स्फूर्त प्रतिसाद

## तब्बल १७५ जणांची मोफत तपासणी



**जालना । प्रतिनिधी -** भगवान परशुराम युवा दलाच्या वतीने आयोजित भव्य नेत्र चिकित्सा शिबिर मोठ्या उत्साहात पार पडले. यामध्ये एकूण १७५ महिला, पुरुष आणि युवक युवती या सर्वांनी लाभ घेतला. यातील ४३ जणांना मोफत शस्त्रक्रियेसाठी व ४० जणांना पुढील तपासणी साठी श्री. गणपती नेत्रालय येथे येण्यास सांगितले. तसेच तब्बल ५८ जणांना मोफत नंबरचे चष्मे देण्यात येणार आहे. आज या कार्यक्रमाच्या समारोप करतांना उपस्थित राय लक्ष्मण प्रसाद बैजल ट्रस्ट चे अध्यक्ष श्री. शिवकुमार बैजल, सौ रेखा बैजल, ॲड. विष्णुपंत नाईक व सर्व तज्ञ मंडळींचा सत्कार करून आभार व्यक्त केला.

# संपादकीय पान

## भारतीय हवामान खात्याचा अंदाज हा धोक्याचा इशारा

स्कायमेट या खाजगी संस्थेनंतर आता भारतीय हवामान खात्यानेही यावर्षी सरासरीपेक्षा कमी पाऊस पडेल असा अंदाज वर्तवला आहे. देशात सरासरी ८७ सेंटीमीटर पाऊस पडतो. सरासरीच्या ९६ ते १०४ टक्के पाऊस सर्वसाधारण मानला जातो. जून ते सप्टेंबर या महिन्यात सरासरीच्या ९४ टक्के पाऊस पडेल अशी शक्यता भारतीय हवामान खात्याने वर्तवली आहे तर स्कायमेट या संस्थेने यावर्षी सरासरीच्या ९२ टक्के पाऊस पडेल असा अंदाज वर्तवला आहे याचाच अर्थ दोन्ही संस्थेने यावर्षी सरासरीपेक्षा कमी पाऊस पडेल असा अंदाज वर्तवला आहे. अलनिनोच्या प्रभावामुळे यावर्षी कमी पाऊस पडेल असा अंदाज वर्तवला जात आहे. केवळ भारतातच नाही तर जगातील अनेक देशात कमी पाऊस पडेल असाही अंदाज स्कायमेटने वर्तवला आहे. महाराष्ट्रात देखील सरासरीपेक्षा कमी पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. कोकणासह मध्य महाराष्ट्र अंक विदर्भात सगळीकडे सामान्यापेक्षा कमी पाऊस राहणार आहे. पॅसिफिक महासागरात सक्रिय असलेल्या अल निनोमुळे ऑस्ट्रेलिया, दक्षिण आशिया व भारताच्या काही भागात दुष्काळ पडण्याची भीतीही या अंदाजात वर्तवण्यात आली आहे. यावर्षी सरासरीपेक्षा कमी पाऊस होणार आहे याचाच अर्थ ८७ सेंटीमीटरपेक्षा कमी पाऊस पडणार आहे. कृषिप्रधान अर्थव्यवस्था असलेल्या आपल्या देशात हवामानाचा अंदाज खूप महत्वाचा ठरतो. भारतातील शेती पावसावर अलवलंबून असल्याने बळीराजाचे डोळे आकाशाकडे लागलेले असतात. शेतीचं देशाच्या अर्थव्यवस्थेत योगदान १४ टक्के असते, तरी देशातील ७० टक्के रोजगार हे शेतीवर अवलंबून आहेत. जून ते सप्टेंबर या कालावधीत कमी पाऊस पडणार असला तरी पावसाचे आगमन वेळीच होणेही तितकेच महत्वाचे आहे. जर पावसाचे आगमन लांबले तर बळीराजाने केलेली पेरणी वाया जाते. पेरणी वाया गेली तर दुबार पेरणीचे संकट उभे राहते. शिवाय परतीचा पाऊसही महत्वाचा आहे. परतीचा पाऊस धुमाकूळ घालतो त्यामुळे हातातोंडाशी आलेले पीक वाया जाते असेच चित्र आपण मागील काही वर्षांपासून पाहत आहोत. सरासरीपेक्षा कमी पाऊस पडला आणि त्यात जर पावसाचे आगमन लांबले किंवा परतीच्या पावसाने धुमाकूळ घातला तर हे वर्ष बळीराजासाठी जिकरीचे ठरू शकते. आधीच अवकाळी पावसाने कंबरडे मोडलेला बळीराजा स्कायमेट आणि हवामान खात्याच्या या अंदाजामुळे आणखी निराश झाला आहे. यंदा पुरेसा पाऊस झाला नाही, तर कर्जाच्या ओझ्याखाली दबलेल्या बळीराजासाठी हा मोठा धक्का असेल. स्कायमेट आणि भारतीय हवामान खात्याने वर्तवलेला अंदाज खरा ठरला, तर देशाची अर्थव्यवस्थाच कोलमेडल. पाऊस कमी झाला तर महागाई वाढेल. शिवाय पिण्याच्या पाण्याचा मोठा प्रश्न निर्माण होईल. यावर्षी पाऊस कमी होण्याची शक्यता असल्याने पाणी जपून वापरावे लागणार आहे. आहे त्या पाण्याचे योग्य नियोजन करावे लागणार आहे. यावर्षी देशाला उष्णतेच्या लाटेचा सामना करावा लागेल असा हवामान खात्याचा अंदाज खरा ठरताना दिसत आहे. उष्णतेच्या लाटेचा परिणाम जलसाठ्यावर होणार आहे. उष्णतेप्रमाणेच कमी पावसाचा अंदाज जर खरा ठरला देशात पुन्हा दुष्काळसदृश्य स्थिती निर्माण होऊ शकते. चार पाच वर्षांपूर्वी आपण दुष्काळाची दाहकता अनुभवली आहे. पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांना दाही दिशा फिरावे लागत होते. हंडाभर पाण्यासाठी नागरिकांना कैक किलोमीटरची पायपीट करावी लागत होती ती स्थिती पुन्हा उदभवू द्यायची नसेल तर प्रशासनाने पाणी वाटपाचे आत्तापासूनच योग्य नियोजन करायला हवे. लोकांनीही त्याला साथ द्यायला हवी. पाणी वाया न घालवता पाण्याची बचत करून संभाव्य पाणीटंचाईला तोंड देता येऊ शकेल. एकूणच कमी पावसाचा स्कायमेट आणि भारतीय हवामान खात्याचा अंदाज भारतासाठी धोक्याचा इशारा आहे.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५.**

## पान १ वरुन

### डॉ. बाबासाहेब ...

सामाजिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रातील अनेक मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, सरपंच, उपसरपंच व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सुभाष पटेकर यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा. अर्जुन पटेकर यांनी केले.

### विद्यार्थी हेच ...

जयंती महापुरुषांची संकल्प पुस्तक वाटपाचा हा एकमेव उपक्रम असल्याचे सांगितले. प्रा. बुलबुले यांनी हा स्तुत्य उपक्रम असुन समाजात वावरत असताना जात धर्म लिंग महत्वाचे नसून शिक्षणामुळे धारण केलेले पद महत्वाचे आहे त्यासाठी शिक्षकांचा आदर करा शाळेत घेतलेल्या ज्ञानाचे सार्थक होईल असे सांगितले. या उपक्रमात जालना शहरातील शांतिनिकेतन विद्यामंदिर,जीवनराव पारे विद्यालय, कै. बाबुराव जाफ्राबादकर विद्यालय व प्रयाग प्राथमिक विद्यालयाने सहभाग घेतला होता. पुस्तक वाटपाची भुमिका विशद करतांना समुहाचे अध्यक्ष राजेभाऊ मगर यांनी सांगितले की, आज प्रातिनिधिक स्वरूपात ५० विद्यार्थ्यांना पुस्तके वाटप करून ह्या विद्यार्थ्यांनी इतर पाच जणांना कडून पुस्तक वाचून घ्यावे व वाचनाचा अभिप्राय नोंदवावा त्यातून काही सर्वोत्कृष्ट वाचकांना पुस्तक भेट देऊन गौरव केला जाईल. परत ह्यातील विजेत्यांना इतरांकडून पुस्तक वाचून घ्यावे व ही वाचन साखळी पुढे पुढे वाढवत जावी अशा प्रकारे वर्षभरात महात्मा फुले यांचे द्विशतकोत्तर जयंती वर्ष साजरे केले जाणार अशी माहिती दिली. तसेच यावेळी समुहाचे सक्रियपणे कार्य करत असल्याबद्दल अशोक माधवले, साजिद खान पठाण, राजेश शेवाळे व संदीप इंगोले यांचा विशेष गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अप्पासाहेब मुळे यांनी तर आभार साजिद खान पठाण यांनी मानले.

### जालना जिल्ह्यात ...

सुरक्षित ठिकाणी त्यांचे स्थलांतर करावे. कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांनी जिल्हा नियंत्रण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांच्या ०२४८२-२२३१३२ या क्रमांकावर किंवा जवळचे तहसील कार्यालय व पोलीस स्टेशनशी संपर्क साधावा

# महिला आरक्षणावर पक्ष-विपक्षाचे स्वार्थी राजकारण; पक्ष-विपक्षांना महिलांबद्दल एवढाच आदर आहे,तर ३३ टक्के उमेदवारी महिलांना का देत नाहीत?

सरकारने महिला आरक्षणाच्या नावाखाली तिन दिवस अधिवेशन चालविले,यात सविस्तर चर्चा सुध्दा झाली.या तिन दिवसांच्या काळात देशाचा करोडो रुपयांचा चुराडा सुध्दा झाला.महिला आरक्षणाचे बिल पश्चिम बंगालच्या निवडणुकी नंतर यायला पाहिजे होते.दिनांक १७ एप्रिल २०२६ पर्यंत लोकसभेत महिला आरक्षणावर घमासान सुरू झाले यानंतर मतदान झाले यामध्ये ५४३ खासदार आहेत या मतदानामध्ये ५२८ खासदारांनी मतदानात सहभाग घेतला बहुमतासाठी ३५२ मतदानाची आवश्यकता होती. परंतु २९८ मते विधेयकाच्या बाजूने पडले व अशा प्रकारे दोनतृतीयांश बहुमत मिळविण्यास सरकारला अपयश आले.तर २३० मते विधेयकाच्या विरोधात पडले व लोकसभेत विधेयक नामंजूर झाले. यावरून स्पष्ट होते की पक्ष-विपक्ष महिलांना व देशाच्या १४० कोटी जनतेची दिशाभूल करण्याचे काम करीत आहेत. आजपर्यत देशाला महिला पंतप्रधान, राष्ट्रपती,महिला लोकसभा अध्यक्ष, महिला मुख्यमंत्री इत्यादी अनेक क्षेत्रांत महिलांनी आरक्षण नसतांना स्वतःच्या बळावर वर्चस्व स्थापित केल्याचे आपण पाहिले आहे आणि पहात आहोत.परंतु सध्या देशात समाजकारणापेक्षा राजकारणाला जास्तच उत आल्याचे दिसून येते. संसदेचे विशेष अधिवेशन गुरुवार दिनांक १६ ते १८ एप्रिल दरम्यान बोलाविलेले या विशेष तिन दिवसीय अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर सरकारने महिला आरक्षण, मतदारसंघ पुनर्रचना आणि मतदारसंघ पुनर्रचना आयोग विधेयक सादर केले.यावर मोठ्या प्रमाणात तिन दिवस चर्चा झाली व मतदान झाले यात विधेयकाच्या बाजूने कमी मते पडल्याने हे विधेयक नामंजूर झाले.महिला आरक्षणाच्या नावाखाली डींढोरा पिटणारे राजकीय पक्ष किंवा पक्ष-विपक्ष एवढा ओहापोह का करीत आहे ही बाब अजूनपर्यंत सर्वसामान्यांना समजलीच नाही.आता विधेयक रद्द झाले आणि पक्ष-विपक्ष मिडिया समोर येऊन एकमेकांवर ताशेरे ओढतांना दिसत आहे व आपापली राजकीय पोळी शेकण्याचे काम करीत आहेत आणि आपापल्या पक्षाच्या बाजू मांडून ढींढोरा पिटत आहे.काही पक्ष म्हणतो की यासाठी मोठे आंदोलन उभारू अशा प्रकारच्या चर्चांना उधाण आले असून मोठ्या प्रमाणात नारेबाजी सुरू झाली आहे. पक्ष-विपक्ष हे दोन्ही म्हणतात की, आम्ही महिला आरक्षणाच्या विरोधात नाही याचे मी स्वागत करतो.राजकीय पक्षांना खरोखरच महिलांना न्याय द्यायचा आहे व आदर करायचा आहे तर प्रत्येक पक्ष महिलांसाठी ३३ टक्के जागा लोकसभेत व विधानसभेत का सोडत नाहीत? राजकीय पक्षांनी जर महिलांसाठी स्वतः ३३ टक्के जागा सोडल्या तर आपोआपच लोकसभेत व विधानसभेत महिलांची संख्या वाढेल. आजही लोकसभेत व विधानसभेत महिलांना आरक्षण नसतांना सुद्धा १०० टक्के पुरूषांमधुन महिला स्वबळावर आमदार- खासदार- मंत्री झालेल्या दिसून येतात.हा तर त्यांचा स्वबळाचा आकडा आहे. जर प्रत्येक पक्षांनी महिलांचा आदर करून ३३ टक्के उमेदवारी लोकसभा- विधानसभा किंवा अन्य ठिकाणी सुरक्षित केल्या तर महिलांची संख्या आपोआपच वाढल्याचे दिसून येईल. आतापर्यत ज्याही महिला लोकसभा व विधानसभेत निवडून आलेल्या आहेत त्या संपूर्ण महिलांनी पुरूषांना मात देऊन विजयी झालेल्या आहेत हि बाब पक्ष-विपक्ष व राजकीय पुढाऱ्यांनी लक्षात ठेवली पाहिजे. यावरून स्पष्ट होते की नारीशक्ती स्वबळावर विजय प्राप्त करू शकते. त्यामुळे महिलांना आरक्षणाची गरज नसुन, राजकारण्यांनमध्ये महिलांना सामोरं आणण्याची मानसिकता पाहिजे असते,ती मानसिकता कोणत्याही पक्षाजवळ नाही ही बाब स्पष्ट होते. महिला आरक्षण हा फक्त राजकीय पुढाऱ्यांचा व पक्ष-विपक्षांचा दिखावा आहे.कारण खरे पहाले तर महिला आरक्षण झाले तर राजकीय पुढाऱ्यांचे देऊळ पाण्यात जाईल अशी त्यांना भिती सुध्दा वाटते.१३१ वे घटनादुरुस्ती विधेयक २०२६ मध्ये एकूण जागांची संख्या वाढवून ८५० करण्याच्या तरतुदींचा समावेश होतो.महिला आरक्षणाच्या नावाखाली लोकसभा सदस्याची ५४३ वरून ८५० करने परंतु याकरिता प्रथम जनगणना होणे गरजेचे असते.परंतु जनगणना झालीच नाही,तर लोकसभा सदस्यांची संख्या कशी काय वाढणार हा ही प्रश्न उपस्थित होतो.देशात लोकसभा सदस्यांची संख्या वाढली तर राज्यसभा सदस्यांची संख्या वाढेल.यानंतर देशातील प्रत्येक राज्यात विधानसभा सदस्यांची संख्या वाढेल, विधानसभा सदस्यांची संख्या वाढली की विधानपरिषदेच्या सदस्यांची संख्या वाढेल.म्हणजे या वाढीव सदस्यांचा अरबो रूपयांचा बोजा देशाच्या १४० कोटी जनतेवर पडेल याचा विचार सरकारने किंवा पक्ष-विपक्षांनी कधी केला का? माझ्या माहितीनुसार देशात लोकसभा सदस्यांची संख्या वाढविण्याची काहीही आवश्यकता नाही.कारण देशात ५४३ लोकसभा खासदार आहेत ,त्याचप्रमाणे २४५ राज्यसभा खासदार आहेत.या व्यतीरिक्त देशात प्रत्येक राज्यात विधानसभा आहेत तेथील विधानसभा आमदार-विधानपरिषद आमदार आहेत.सोबतच देशाच्या प्रत्येक राज्यांच्या शहरांमध्ये महानगरपालिका आहेत तेथील नगरसेवक, त्याचप्रमाणे देशातील प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा परिषदा आहेत तेथील सदस्य,या व्यतिरिक्त ग्रामपंचायत, नगरपालिका, सरपंच इतर अनेक सदस्य देशाच्या विकासाच्या दृष्टिकोनातून जनतेने निवडून दिलेले आहेत.येवढा मोठा फौजफाटा देशसेवेसाठी असतांना खासदारांची संख्या वाढविण्याची सरकारला गरज का पडावी?आज जर देशात खासदारांची संख्या वाढली तर त्यांचा खर्च मोठ्या प्रमाणात वाढेल हाच पैसा सरकारने देशाच्या विकासासाठी वापरला व महागाई कमी केली तर देशाचा विकास झपाट्याने होईल.आज देशाच्या एक कोटी ईपीएस -९५ पेन्शन धारकांचा मुद्दा गेल्या १२ वर्षांपासून लोकसभेत रखडलेला आहे ही बाब पक्ष-विपक्ष यांना चांगल्या प्रकारे ग्यात आहे. तरी सरकार या महत्त्वपूर्ण मुद्याकडे पाठ फिरवून ईपीएस-९५ पेंशन धारकांना किमान पेन्शन १००० रूपयांवरून ७५०० रूपये करण्यास तयार नाही.या हजार रूपयात ईपीएस पेन्शन धारक जगुही शकत नाही आणि मरूही शकत नाही अशी गंभीर आणि भयावह परिस्थिती आज ईपीएस पेन्शन धारकांची आहे. म्हणजे जे काम होण्या लायक आहे आणि पक्षविपक्षांची सहमती आहे असे विधेयक सरकार मंजूर करीत नाही ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे.यावरून स्पष्ट होते की सरकार किंवा पक्ष-विपक्ष आपली राजकीय पोळी शेकण्यासाठी काहीही करण्यास तयार असतात. सर्वप्रथम प्रत्येक राजकीय पक्षाने आपली मानसिकता बनविली पाहिजे की, आपण खरोखरच महिलांच्या आरक्षणाच्या बाजूने आहोत का?याचा पुरेपूर विचार करून प्रथम प्रत्येकांनी (पक्षांनी) आपल्या पक्षामार्फत तत्परता दाखवुन ३३ टक्के किंवा ५० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त उमेदवारी महिलांना देऊन नवीन इतिहास घडवायला हवा.नंतर कायद्याच्या चाकोरीतून लोकसभेत विधेयक पारित करण्यासाठी प्रयत्न करावेत. म्हणजे प्रत्येक पक्षांनी स्वतः पासून सुरूवात करावी नंतर कायद्याच्या किंवा विधेयकाच्या मार्फत बाजू मांडावी असे मला वाटते.जय हिंद.

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# स्पर्धेतून नेतृत्व गुण विकसित होतात - डॉ. कृष्णकांत कनवारीया

**जालना | प्रतिनिधी -** शालेय स्तरावर आयोजित विविध स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व गुण विकसित होतात, असे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कृष्णकांत कनवारीया यांनी केले.

जिल्हा परिषद शिक्षण विभाग (प्राथमिक), जालना यांच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय हुतात्मा जनार्दनमामा नागापूरकर वादविवाद व प्रश्नमंजुषा स्पर्धा २०२५-२६ मधील विजेत्या विद्यार्थ्यांचा बक्षीस वितरण कार्यक्रम कै. यशवंतराव चव्हाण सभागृहात उत्साहात पार पडला. यावेळी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

कार्यक्रमास शिक्षणाधिकारी (प्राथमिक) श्रीमती संगीता भागवत, उपशिक्षणाधिकारी संजय कायंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी डॉ. कनवारीया यांच्या हस्ते वादविवाद स्पर्धेतील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक तसेच प्रश्नमंजुषा स्पर्धेतील प्रथम क्रमांकाच्या एकूण २४ विद्यार्थ्यांना सायकलींचे वाटप करण्यात आले. तसेच प्रश्नमंजुषा स्पर्धेतील द्वितीय क्रमांकाच्या १२ विद्यार्थ्यांना स्पोर्ट्स किट देऊन गौरविण्यात आले.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. कनवारीया यांनी स्पर्धेमुळे नेतृत्व, आत्मविश्वास आणि निर्णयक्षमता विकसित होते, असे सांगितले. यशस्वी होण्यासाठी चिकाटी, सातत्य आणि आत्मविश्वास या गुणांचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले.

या कार्यक्रमाला गिरीश पुजारी, गटशिक्षणाधिकारी भरत वानखेडे, राजेंद्र कायंदे, कैलास खरात, जावेद खान तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी, पालक व शिक्षक उपस्थित होते.





# राज्यात प्रत्येक पोलीस ठाण्यात ‘विशेष बाल पोलीस पथक’ अनिवार्य

## राज्यात अल्पवयीन मुला-मुलींसंदर्भातील गुन्ह्यांमध्ये चिंताजनक वाढ : आयोगाचे सदस्य डॉ. संजय लाखेपाटील यांची माहिती

**जालना । प्रतिनिधी -** राज्यातील अल्पवयीन मुला-मुलींवरील वाढत्या गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोग यांनी मोठा आणि निर्णायक निर्णय घेतला आहे. मुंबईसह राज्यातील प्रत्येक पोलीस आयुक्त, पोलीस अधीक्षक कार्यालय तसेच प्रत्येक पोलीस ठाण्यात ‘विशेष बाल पोलीस पथक कक्ष’ स्थापन करण्याच्या वैधानिक सूचना देण्यात आल्या आहेत. आयोगाचे सदस्य डॉ. संजय लाखेपाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार, राज्यात अल्पवयीन मुला-मुलींसंदर्भातील गुन्ह्यांमध्ये चिंताजनक वाढ झाली आहे. विशेषतः मुलींवरील अत्याचार, लैंगिक गुन्हे आणि अन्य गंभीर प्रकार मोठ्या प्रमाणात वाढले असल्याचे विविध पाहणी अहवालातून स्पष्ट झाले आहे. आर्थिक पाहणी अहवालानुसार, राज्यात गतवर्षी २५ हजारांहून अधिक बालसंबंधित गुन्हे नोंदवले गेले, तर सन २०२४ च्या तुलनेत या गुन्ह्यांमध्ये ३ हजारांची वाढ झाली आहे. ही वाढती आकडेवारी लक्षात घेऊन आयोगाने तातडीने कारवाई करत राज्यातील सर्व पोलीस यंत्रणेला स्पष्ट निर्देश दिले आहेत. डॉ. संजय लाखेपाटील यांनी पुढे सांगितले की, राज्यात अपहरण, लैंगिक अत्याचार, बालमजुरी, बालविवाह, भीक मागण्यासाठी मुलांचा वापर, हरवलेली बालके आणि मानवी तस्करी यांसारखे गंभीर प्रकार सातत्याने वाढत आहेत. अशा प्रकरणांमध्ये पोलीस आणि इतर यंत्रणांकडून बालस्नेही पद्धतीने हाताळणी होणे अत्यावश्यक आहे. यासाठीच विशेष पथकाची संकल्पना पुढे आणण्यात आली आहे. या पथकामध्ये पोलीस उपअधीक्षक दर्जाचा अधिकारी प्रमुख असेल. तसेच रेल्वे पोलीस, स्थानिक पोलीस अधिकारी आणि बाल क्षेत्रातील अनुभवी दोन सामाजिक कार्यकर्त्यांचा समावेश असणार आहे. सर्व सदस्यांना बालकांशी संवाद, कायदे आणि प्रक्रिया याबाबत प्रशिक्षित करणे बंधनकारक करण्यात आले आहे. आयोगाने दिलेल्या सूचनांमध्ये बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ मधील कलम १०७ (१) व १०७ (२) चा स्पष्ट उल्लेख करण्यात आला आहे. या कायद्यानुसार प्रत्येक पोलीस ठाण्यात ‘बाल कल्याण पोलीस अधिकारी’ नियुक्त करणे बंधनकारक आहे.

दरम्यान, मुंबईतील वरळी येथे झालेल्या आयोगाच्या बैठकीत अध्यक्ष ॲड. संजय पुरोहित (नंदुरबार), सदस्य डॉ. संजय लाखेपाटील (जालना), श्रीमती गितांजली बुटी (नागपूर), श्रीमती मिलन जंगम (रत्नागिरी), श्रीमती शुभांगी तांबट (पुणे), अतुल देसाई (कोल्हापूर), प्रविण बुजाडे (अमरावती), तसेच सचिव पंकज देवरे (आयएएस), प्रशासकीय अधिकारी श्रीमती वंदना जैन आणि इतर अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत आयोगासमोर प्रलंबित असलेल्या तब्बल १६०० प्रकरणांच्या सुनावणीसाठी वेळापत्रक निश्चित करण्यात आले आहे.

राज्यातील सर्व पोलीस आयुक्त, पोलिस अधीक्षक आणि रेल्वे पोलिस अधीक्षक यांना बालहक्क आयोगाने पत्र पाठवून अंमलबजावणीसाठी आदेशीत केले आहे.

**काय आहेत आयोगाच्या प्रमुख सूचना?**

प्रत्येक पोलीस आयुक्त व पोलीस अधीक्षक कार्यालयात स्वतंत्र ‘बाल पोलीस पथक कक्ष’ तसेच प्रत्येक पोलीस ठाण्यात ‘बाल कल्याण पोलीस अधिकारी’ नियुक्ती बंधनकारक आहे. कक्ष बालस्नेही ( ) स्वरूपाचा असणे आवश्यक आहे. अधिकारी व कर्मचाऱ्यांना बालहक्क व कायद्याचे विशेष प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. कक्षात संबंधित अधिकाऱ्यांची नावे व संपर्क क्रमांक फलकावर प्रदर्शित करणे बंधनकारक असून सर्व माहिती नियमित अद्ययावत ठेवणे आणि १ महिन्याच्या आत संपूर्ण अहवाल आयोगाकडे सादर करणे आवश्यक आहे.

‘बालसुरक्षा’ हा आता प्रशासनाचा कसोटीचा विषय राज्यात वाढत्या गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर ही सूचना केवळ औपचारिक नसून प्रशासनासाठी कसोटीची वेळ ठरणार आहे. प्रत्येक पोलीस ठाण्यात बालस्नेही वातावरण निर्माण करून बालकांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देण्याचा स्पष्ट संदेश आयोगाने दिला आहे. आता या आदेशांची अंमलबजावणी कितपत वेगाने आणि प्रभावीपणे होते, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.



# मानवी तस्करी पीडितेच्या प्रत्यार्पणासाठी मुंबई उच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निकाल

## यंत्रणेच्या दिरंगाईवर ओढले ताशेरे

बांगलादेशातून नोकरीच्या आमिषाने भारतात आणून वेश्याव्यवसायात ढकललेल्या एका पीडित महिलेच्या प्रत्यार्पणातील दिरंगाईबद्दल मुंबई उच्च न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. पीडितेची साक्ष वेळेवर न नोंदवल्याने तिच्या मायदेशी परतण्यात अडथळा निर्माण झाल्याने, न्यायालयाने कनिष्ठ न्यायालयाच्या कामकाजावर ताशेरे ओढत पीडितेला तातडीने न्याय देण्याचे निर्देश दिले आहेत. या निकालामुळे पीडित विदेशी नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण आणि जलद न्याय प्रक्रियेचे महत्त्व पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे, अशी माहिती नोटरी असोसिएशन जालनाचे कार्याध्यक्ष ॲड. महेश एस. धन्नावत यांनी दिली.

या प्रकरणात, बांगलादेशी पीडित महिलेला एका एजंटने भारतात चांगल्या पगाराच्या नोकरीचे आमिष दाखवून आणले होते. मात्र, येथे आल्यानंतर तिला वेश्याव्यवसायात ढकलण्यात आले. पोलिसांनी एका छाप्यात तिची सुटका केली आणि आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला. आरोपींवर भारतीय दंड संहिता , १८६० चे कलम ३६६-, ३६६-, ३७०(३), ३७०(५), ३७०-(१) (आता भारतीय न्याय संहिता , २०२३ नुसार संबंधित तरतुदी कलम १४०(२), १४२ आणि १४५ अंतर्गत येतात), अनैतिक वाहतूक (प्रतिबंध) कायदा, १९५६ आणि लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण कायदा, २०१२ च्या विविध कलमांनुसार गुन्हा नोंदवण्यात आला. पीडिता सध्या एका सेवाभावी संस्थेच्या निवारागृहात असून, तिचे सहा वर्षांचे मूल बांगलादेशात तिची वाट पाहत आहे.

पीडितेच्या प्रत्यार्पणासाठी केंद्र सरकारने यापूर्वी परवानगी दिली होती, परंतु खटल्याची सुनावणी करणाऱ्या कनिष्ठ न्यायालयाने वेळेत आरोपींवर आरोप निश्चित केले नाहीत किंवा पीडितेची साक्ष नोंदवली नाही. परिणामी, प्रत्यार्पणाची परवानगीची मुदत संपली आणि पीडितेचे भारतात अडकून पडणे सुरूच राहिले. या दिरंगाईमुळे पीडितेला शारीरिक आणि मानसिक त्रासाला सामोरे जावे लागत असून, ती आजारी पडल्याने तिच्या उपचाराचा खर्चही सेवाभावी संस्थेला उचलावा लागत आहे. या सर्व बाबींची गंभीर दखल घेत उच्च न्यायालयाने यंत्रणेच्या गलथान कारभारावर तीव्र शब्दात नाराजी व्यक्त केली.

न्यायमूर्ती ए. एस. गडकरी आणि कमल खाता यांच्या खंडपीठाने या प्रकरणात महत्त्वपूर्ण आदेश दिले आहेत. न्यायालयाने कनिष्ठ न्यायालयाला तातडीने आरोपींवर आरोप निश्चित करण्याचे निर्देश दिले. जर कोणी आरोपी फरार असेल, तर फौजदारी प्रक्रिया संहिताच्या कलम २९९ (आता भारतीय नागरिक सुरक्षा संहिता () चे कलम ३३५) नुसार त्याचा खटला वेगळा करून उपस्थित आरोपींवर कारवाई पुढे चालू ठेवण्यास सांगितले आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, पीडितेच्या प्रत्यार्पणाचा मार्ग मोकळा व्हावा यासाठी तिची साक्ष २४ मार्च २०२६ पर्यंत नोंदवून पूर्ण करावी, असा सक्त आदेश न्यायालयाने दिला आहे. तसेच, या दिरंगाईचे कारण स्पष्ट करणारा अहवाल सत्र न्यायालयाच्या निबंधकांना सादर करण्यास सांगितले आहे.

या निकालावर प्रतिक्रिया देताना, नोटरी असोसिएशन जालनाचे कार्याध्यक्ष, ॲड. महेश एस. धन्नावत म्हणाले, ‘‘मुंबई उच्च न्यायालयाचा हा निर्णय अत्यंत स्वागतार्ह आणि मानवतेच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. न्याय मिळवण्यास होणारा विलंब हा अन्यायच असतो, हे या निकालाने पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. विशेषतः जेव्हा पीडित व्यक्ती परदेशी नागरिक असते, तेव्हा न्यायप्रक्रियेतील दिरंगाईमुळे तिचे अतोनात नुकसान होते. न्यायालयाच्या या हस्तक्षेपामुळे केवळ पीडितेला तिच्या घरी परत जाण्यास मदत होणार नाही, तर अशा प्रकरणांमध्ये प्रशासकीय आणि न्यायालयीन यंत्रणांनी अधिक संवेदनशीलतेने आणि वेगाने काम करण्याची गरज असल्याचेही अधोरेखित झाले आहे. हा निकाल पीडितांच्या मानवाधिकारांचे रक्षण करणारा एक मैलाचा दगड आहे.‘‘

या प्रकरणाची उच्च न्यायालयाच्या या कठोर भूमिकेमुळे पीडित महिलेला लवकरच न्याय मिळून ती तिच्या मायदेशी, बांगलादेशात आपल्या मुलाकडे परत जाईल, अशी आशा निर्माण झाली आहे.

# दत्तनगर भागाला १५ दिवसांनंतर पाणीपुरवठा; खडकपूर्णाचे पाणी असूनही नागरिकांची वणवण!

## प्रशासकांचे नियोजनाकडे दुर्लक्ष; टेंभुर्णी ग्रामस्थांमधून संताप व्यक्त

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** तालुक्यापेक्षाही मोठी लोकसंख्या असलेल्या टेंभुर्णी गावात अखेर खडकपूर्णा धरणाची पाणीपुरवठा योजना सुरू झाली खरी, मात्र नियोजनाच्या अभावामुळे दत्तनगर भागातील नागरिकांच्या नशिबी अद्यापही पाण्यासाठी वणवणच आली आहे. या भागात तब्बल १५ ते २० दिवसांनंतर पाणी मिळत असल्याने ‘‘योजना असूनही उपयोग काय?‘‘ असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत.


नियोजनाचा पुरता बोजवारा

सुमारे २५ ते ३० हजार लोकवस्तीच्या या गावात खडकपूर्णाचे पाणी आल्याने सुरुवातीला आनंदाचे वातावरण होते. मात्र, दत्तनगर सारख्या मोठ्या वस्तीला पाणी देताना प्रशासनाची दमछाक होत आहे. सध्या आयुष्या उर्दू शाळेच्या मागील टाकीवरून पाणीपुरवठा केला जातोय, तर कब्रस्तानमधील टाकी सध्या बंद अवस्थेत आहे. नागरिकांनी दिलेल्या माहितीनुसार दत्तनगर परिसरात साधारणतः १४ ते १५ झोन तयार करण्यात आले आहेत.

एवढ्या मोठ्या क्षेत्रासाठी किमान ३ टाक्यांची आवश्यकता असताना, अपुऱ्या नियोजनामुळे पाणी मिळण्यासाठी १५ ते २० दिवस वाट पाहावी लागते.

**रस्त्यांवर पाण्याचे लोट, ड्रेनेज व्यवस्था कोलमडली**

एकीकडे पिण्याच्या पाण्यासाठी नागरिक त्रस्त असताना, दुसरीकडे पाणीपुरवठा सुरू झाल्यावर मुख्य रस्त्यांवर पाण्याचे लोट साचतात. गावातील ड्रेनेज आणि नाल्यांची व्यवस्था पूर्णतः कोलमडली असून, सांडपाणी रस्त्यावरून वाहत असल्याने नागरिकांना चालणेही कठीण झाले आहे. छोट्या गल्ल्यांमध्येही हीच परिस्थिती असल्याने आरोग्याचा प्रश्न गंभीर होण्याची भीती व्यक्त होत आहे.




**प्रशासकाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह**

सध्या ग्रामपंचायतीवर प्रशासकाची नियुक्ती आहे. ‘‘लोकप्रतिनिधी नसल्याने कर्मचाऱ्यांवर कोणाचाही वचक राहिला नाही,‘‘ अशी खंत ग्रामस्थ व्यक्त करत आहेत. जुन्या सरपंचांच्या काळातील शिस्तीची आठवण काढत एका सुज्ञ नागरिकाने सांगितले की, ग्रामपंचायतीचा कारभार केवळ कागदोपत्री चालवून विकास होत नाही; त्यासाठी प्रत्यक्ष कामाचा दर्जा आणि कर्मचाऱ्यांवर नियंत्रण असणे गरजेचे आहे.

दत्तनगर भागातील पाणीटंचाई आणि रस्त्यांवरील पाण्याचा प्रश्न निकाली काढण्यासाठी ग्रामविकास अधिकारी व मुख्य प्रशासकांनी तातडीने लक्ष द्यावे, अशी मागणी टेंभुर्णी ग्रामस्थांकडून केली जात आहे.

# जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा दुधा येथील विद्यार्थ्यांचा मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या हस्ते सन्मान



**दत्ता देशमुख**

**टेंभूर्णी -** दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा गणित विज्ञान प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन जिल्हास्तरावर करण्यात आले होते या स्पर्धेमध्ये जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा दुधा येथील विद्यार्थ्यांनी स्पर्धेमध्ये विचारलेल्या प्रश्नांची योग्य उत्तरे देऊन द्वितीय क्रमांक मिळवला. यामध्ये भाग्यश्री शिंदे ,स्नेहल जाधव व सार्थक खुळे या विद्यार्थ्यानी सहभाग घेतला. गणित विज्ञान प्रश्नमंजुषा स्पर्धेचे बक्षीस वितरणचा कार्यक्रम दिनांक १७/ ४ /२०२६ ला कै. यशवंतराव चव्हाण सभागृह जालना येथे आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जालना जिल्हा परिषदेच्या प्रा . शिक्षणाधिकारी मा.संगीता भागवत मॅडम यांची उपस्थिती होती तर प्रमुख अतिथी म्हणून जालना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मा. डॉ. कृष्णकांत कनवारिया साहेब तसेच उपशिक्षणाधिकारी मा.श्री संजयजी कायंदे साहेब व इतर मान्यवर उपस्थित होते .या स्पर्धेमध्ये द्वितीय क्रमांक मिळवल्यामुळे जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा दुधा येथील विद्यार्थ्यांचा व शिक्षकांचा मा. मुख्य कार्यकारी अधिकारी सन्माननीय श्री डॉ. कृष्णकांत कनवारिया साहेब जिल्हा परिषद जालना यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला .यामध्ये द्वितीय क्रमांक मिळालेल्या सर्व विद्यार्थ्यांना स्पोर्ट किटचे वाटप करण्यात आले. या सर्व विद्यार्थ्यांचे व या परीक्षेसाठी मेहनत घेणारे शाळेचे मुख्याध्यापक श्री विजय कांगणे सहाय्यक शिक्षक श्री निलेश पिसे आणि श्री पंजाब दांदडे यांचे तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी मा.श्री गोविंद चव्हाण साहेब ,शिक्षण विस्ताराधिकारी मा.श्री के .जी. राठोड सर केंद्रप्रमुख मा.श्री एल. जे .खरात सर तसेच शाळा व्यवस्थापन समिती दूधा ग्रामपंचायत कार्यालय दुधा व पालकांनी अभिनंदन केले.

### भोंदू राजेंद्र गडगे याच्यावर पोलीसांची कारवाई

**अहिल्यानगर -** संगमनेर तालुक्यातील वडगावपान येथील तथाकथित ‘दत्तधाम दरबार’ चालवणाऱ्या भोंदू राजेंद्र गडगे याच्याविरोधात पोलिसांनी कारवाई केली आहे. दरबारावर पोलिसांनी छापा टाकत संपूर्ण परिसर सिल केला. या कारवाई दरम्यान दरबारात स्पॉट पंचनामा करण्यात आला. तसेच विविध औषधांचे नमुनेही पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

# भगवान परशुराम जयंतीनिमित्त भव्य शोभायात्रा; बालाजी मंदिर ते मस्तगड मार्गावर उत्साहाची लाट

**जालना । प्रतिनिधी -** भगवान परशुराम जयंतीनिमित्त जालना शहरात भव्य आणि उत्साहपूर्ण शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले. कचेरी रोडवरील बालाजी मंदिरापासून मस्तगडपर्यंत काढण्यात आलेल्या या शोभायात्रेत ब्राह्मण समाजातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला होता. पारंपरिक वाद्यांचा गजर, भगवे झेंडे आणि जयघोषांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता.

या शोभायात्रेचे विशेष आकर्षण म्हणजे संगमनेर येथून आलेले महाकाल अघोरी पथक होते. त्यांच्या आकर्षक सादरीकरणाने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. पथकाच्या अनोख्या वेशभूषा व ढोल-ताशांच्या तालावर सादर केलेल्या कला प्रकारामुळे वातावरणात वेगळाच उत्साह निर्माण झाला. शोभायात्रेदरम्यान युवकांनी उत्स्फूर्तपणे नृत्य करत भगवान परशुराम यांचे विचार आणि संदेश तळागाळापर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला. ‘‘धर्म, शौर्य आणि अन्यायाविरुद्ध लढा’’ हा परशुरामांचा संदेश जनमानसात रुजवण्याचा प्रयत्न या माध्यमातून करण्यात आला.

दरवर्षी जालना शहरात भगवान परशुराम जयंतीनिमित्त दोन वेगवेगळ्या शोभायात्रा काढल्या जातात. मात्र यावर्षी जुना जालना भागात एकच एकत्रित शोभायात्रा काढण्याचा निर्णय ब्राह्मण समाजाने घेतला. या निर्णयामुळे समाजात एकोपा आणि एकजूट दिसून आली असून सर्वत्र आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या शोभायात्रेत अडवोकेट बलवंत नाईक अमित कुलकर्णी, सुमित कुलकर्णी, अमोल देशमुख, गजेंद्र देशमुख, गणेश लोखंडे, रवी जपे, अनुराग संगमने, कृष्णा दंडे, संकेत मोहिते, संकेत पाठक, एकूणच, भगवान परशुराम जयंतीनिमित्त आयोजित या



वेदांत कुलकर्णी, प्रणव निर्फी, प्रतीक तळणीकर, देशपांडे, विशाल देशपांडे, अजिंक्य देशमुख, चंद्रकांत कुलकर्णी, शार्दुल, राहुल मुळे, अजिंक्य कोळेश्वर, अविनाश पांडव यांसह समाजबांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. भव्य शोभायात्रेमुळे जालना शहरात धार्मिक उत्साहासोबत सामाजिक एकतेचा सुंदर संदेश देण्यात आला.

# राजेवाडी जि. प. शाळेचे जगत घुगे यांचा उत्कृष्ट मुख्याध्यापक पुरस्काराने सन्मान



**जालना । प्रतिनिधी** - बदनापूर तालुक्यातील राजेवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक जगत श्रीराम घुगे यांचा त्यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल उत्कृष्ट मुख्याध्यापक म्हणून गौरव करण्यात आला. बदनापूरच्या गटविकास अधिकारी ज्योती राठोड यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले.

सोहळ्याप्रसंगी गटशिक्षणाधिकारी गजानन वाळके, डी. एन. शिरसागर, शाखा अभियंता श्री. राऊत तसेच सर्व विभाग प्रमुख आणि शिक्षक उपस्थित होते.

जगत घुगे यांनी आपल्या प्रदीर्घ सेवाकाळात विविध शाळांचा कायापालट केला आहे. १९९६ मध्ये नजीक पांगरी येथे असताना त्यांनी राबवलेल्या अभिनव उपक्रमांची दखल जिल्हास्तरावर घेतली गेली होती. त्यानंतर २००० ते २०१० या काळात दगडवाडी येथील शाळेत कार्यरत असताना, दिल्लीचे शिक्षण सल्लागार विनय पटनायक आणि तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी निपुण विनायक यांच्या हस्ते त्यांचा सन्मान झाला होता. दगडवाडी येथील त्यांची वांग्याची परसबाग संपूर्ण जिल्ह्यात प्रसिद्ध झाली होती. गमंत शाळामध्ये त्यांनी अव्वल क्रमांक मिळविला होता. स्वतः गाडगे बाबाचा वेश धारण करून विद्यार्थ्यासोबत विविध पथनाट्य सादरीकरण केले. बालविवाह थांबलाच पाहिजे, या पथनाट्यात जिल्हाभर महत्वाची भूमिका त्यांनी निभावली, विविध गावामध्ये शाळेला जागा उपलब्ध करून दिली, लोकचेतना अभियान जिल्हाभर प्रभावीपणे राबविले. निवडणूक काळात ईव्हीएम तज्ञ म्हणून तर ३ निवडणुकांमध्ये मास्टर ट्रेनर म्हणून काम केले आहे, नाट्यांकुर स्पर्धेत विद्यार्थ्यांना सहभागी करून सर्वोत्कृष्ट ट्रॉफी मिळविली, त्यांच्या लेझिम पथकावर जर्मनीच्या लोकांनी नृत्य केले आहे. लायन्स व रोटरीच्या माध्यमातून विविध शाळेला मदत मिळवून दिली. आनंददायी शिक्षणाचे प्रणेते म्हणून ते ओळखले जातात. विविध प्रशिक्षणात उत्कृष्ट प्रशिक्षक म्हणून त्यांना वेळोवेळी सन्मानीत करण्यात आलेले आहे. सांस्कृतिक, क्रीडा स्पर्धेत राज्य विभाग, जिल्हा स्तरावर त्यांच्या विद्यार्थ्यांनी बक्षिस मिळविलेले आहे. ऐ वतन तेरे लिए हा जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सांस्कृतिक कार्यक्रमाचा संपूर्ण खर्च त्यांनी कै. श्रीराम घुगे प्रतिष्ठाणच्यावतीने दहा वर्ष केला आहे आणि कडवंची जिल्हा परिषद शाळेत ई-लर्निंगसह १६८ पुरस्कार शाळेला मिळवून देण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे, सातत्याने विद्यार्थ्यामध्ये रममाण होणे, त्यांना त्यांच्या गतीने पुढे घेऊन जाणे त्यांना आवडते. आज आधुनिक सुविधेद्वारे विविध कार्य सिद्ध केले आहे. सेलगाव येथील पीएमश्री जिल्हा परिषद हायस्कूलमध्ये ७ वर्षे सेवा देताना त्यांनी विद्यार्थी संख्या वाढवण्यासोबतच विद्यार्थ्यांना राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये मार्गदर्शन केले. शालेय परिसरात विविध वृक्षारोपण करून ते जतन केले. ज्यामुळे आज शाळेचे आंगण शोभून दिसत आहे. शाळेतील विदयार्थ्यांचा वाढदिवस वृक्ष, पेन, वही व इतर शालेय साहित्य देऊन त्यांनी साजरा केला आहे. सध्या राजेवाडी येथे कार्यरत असताना अल्पावधीतच त्यांनी लोकसहभाग, एनजीओची मदत आणि विविध उपक्रमांच्या माध्यमातून शाळेची गुणवत्ता उंचावली आहे. त्यांच्या याच कार्याची फलश्रुती म्हणून त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

प्रशासकीय कौतुकाची थाप ऊर्जा देणारी-जगत घुगे : याप्रसंगी बोलताना जगत घुगे म्हणाले की, शिक्षण क्षेत्रात काम करताना विद्यार्थ्यांचा विकास हेच आमचे मुख्य ध्येय असते. प्रशासनाकडून मिळणारे कौतुक आणि शाबासकीची ही थाप आम्हा शिक्षकांना अधिक जोमाने काम करण्यासाठी ऊर्जा देते. हा सन्मान केवळ माझा नसून माझे सर्व सहकारी शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या कष्टाचा आहे. आगामी काळातही शाळेची गुणवत्ता वाढवण्यासाठी मी सदैव प्रयत्नशील राहीन.

# संजीवनी इंग्लिश स्कूल टेंभुर्णी येथे शिक्षक पालक मेळावा संपन्न



**दत्ता देशमुख**

**टेंभूर्णी** - ता जाफराबाद येथील संजीवनी इंग्लिश स्कूल टेंभुर्णी येथे शिक्षक पालक मेळावा मोठ्या थाटात पार पडला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून श्री रघुराम साहेब उखर्डे हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून पत्रकार श्री बाळाजी शेवाळे हे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे प्राचार्य प्रा सतीश जाधव यांनी केले. मेळाव्यादरम्यान अनेक पालकांनी आपले मनोगत व्यक्त करत शाळेच्या शैक्षणिक प्रगतीबाबाद समाधान व्यक्त केले. विद्यार्थ्यांना प्रगती पत्रकाबरोबर मेडल्स देऊन त्यांच्या वर्षभराच्या मेहनतीचे गुणगौरव करण्यात आला. पुढील शैक्षणिक वर्षात अमलात आणण्याच्या उपाययोजना तसेच विद्यार्थी प्रगतीबाबाद विचारविनिमय करण्यात आला. अध्यक्षीय समारोप करताना श्री रघुराम साहेब यांनी पालकांनी आपल्या पाल्याला वेळ देऊन त्याच्याशी हितगुज करावे जेणे करून विद्यार्थी मोबाईल पासून दूर राहतील असा सल्ला दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैशाली पंडित यांनी केले तर आभार प्रदर्शन भाग्यश्री जाधव यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शीला जाधव व हिना शेख यांनी विशेष प्रयत्न केले.

# कै. बाबुराव जाफ्राबादकर माध्यमिक विद्यालयचे घवघवीत यश!




**जालना । प्रतिनिधी** - येथील कै.बाबुराव जाफ्राबादकर माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी १०० शिक्षक क्लब जालना तर्फे आयोजित डॉ.बाबासाहेब आंबेडकर व महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त घेण्यात आलेल्या सामान्य ज्ञान परीक्षेमध्ये कै. बाबुराव जाफ्राबादकर माध्यमिक विद्यालय व रामचंद्र किनगावकर प्राथमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश प्राप्त करून सात ट्रॉफी संपादन केल्या.या बक्षिसाचे वितरण जालना जिल्हा परिषद उपशिक्षणाधिकारी गिरीश पुजारी तसेच ज्येष्ठ अधिव्याख्याते श्री मान्टे सर तसेच सामाजिक चळवळीचे राजकुमार बुलबुले,समाजसेवक दत्तात्रय देशमुख, शंभर शिक्षक क्लब ऑफ जालना चे अध्यक्ष राजेभाऊ मगर, जि. प. प्रशाला मुलांची येथील मुख्याध्यापक डॉ. शिवनंदा मेहत्रे, जीवनराव पारे विद्यालयाचे मुख्याध्यापक सुभाष पारे यांच्या हस्ते बक्षिसाचे वितरण करण्यात आले. यामध्ये कु.समृद्धी घायाळ कु.अदिती राय, कु. भक्ती लाड, कु. वैष्णवी पाथरकर , कु. बीना इंगळे,.कु. ज्ञानेश्वरी सस्ते, आरव घायाळ या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे. उपक्रमशील शिक्षक संदीप इंगोले यांनी हा आपल्या शाळेमध्ये सामाजिक उपक्रम राबविला आहे. जयंती नाचून नाही तर वाचून साजरी करावी अशा पद्धतीचा हा उत्कृष्ट असा उपक्रम शंभर शिक्षक क्लब ऑफ जालना तर्फे बनविण्यात आला आहे. समाजामध्ये एक आदर्श निर्माण होण्याचे हे एक लक्षण आहे. ह्या यशासाठी हिंदू समाज संस्थेचे अध्यक्ष ॲड.संजीव देशपांडे,उपाध्यक्ष जगदीश बडवे,सचिव चंद्रशेखर वाघमारे, संचालक कुमारजी देशपांडे, नितीन कोळेश्वर तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका मीनाक्षी कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# वडिलांचे छत्र हरवूनही जिद्दीने गाठले यश

## उज्जैनपुरीची भाग्यश्री पिंपळे पोलीस कॉन्स्टेबल



**जालना । प्रतिनिधी** - जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर जीवनातील संकटांवर मात करत बदनापूर तालुक्यातील उज्जैनपुरी येथील भाग्यश्री कचरू पिंपळे हिने पोलीस कॉन्स्टेबल पदावर यश मिळवत गावाचे नाव उज्ज्वल केले आहे. वडिलांचे छत्र हरवलेल्या या मुलीने कठीण परिस्थितीतून मार्ग काढत मिळवलेले हे यश आज अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

उज्जैनपुरी गावातील ही पहिलीच मुलगी पोलीस दलात दाखल झाली असून, तिच्या यशामुळे संपूर्ण गावात आनंदाचे आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे. भाग्यश्रीच्या या यशाचा जल्लोष गावकऱ्यांनी मिरवणूक काढत साजरा केला. ढोल-ताशांच्या गजरात आणि जल्लोषात तिचे स्वागत करण्यात आले.

स्थानिकांच्या मते, उज्जैनपुरी हे गाव रोकडोबा महाराजांच्या कृपेने ओळखले जाते. गावातून शासकीय शिपायापासून ते जिल्हाधिकाऱ्यांपर्यंत अनेक जण उच्च पदावर पोहोचले असून, त्यांचाच आदर्श डोळ्यासमोर ठेवून भाग्यश्रीने पोलीस सेवेत जाण्याचे स्वप्न पाहिले आणि ते पूर्ण केले.

भाग्यश्री पिंपळे हिची पोलीस कॉन्स्टेबल म्हणून हिंगोली येथे नियुक्ती करण्यात आली आहे. या यशाबद्दल बोलताना ती म्हणाली की, ''आई-वडील आणि गावकऱ्यांच्या पाठिंब्यामुळेच हे यश मिळवू शकले. त्यांच्या आशीर्वादामुळेच मी आज या पदापर्यंत पोहोचले आहे.'' तिने आपल्या यशाचे श्रेय आई-वडील व गावकऱ्यांना दिले.

भाग्यश्रीच्या या यशामुळे उज्जैनपुरी गावातील इतर मुलींनाही नवी प्रेरणा मिळाली आहे. कठीण परिस्थितीतही जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर यश मिळवता येते, हे भाग्यश्रीने दाखवून दिले आहे.

संपूर्ण गावासाठी अभिमानाची बाब ठरलेल्या या यशाबद्दल सर्वत्र तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# विवेकानंद इंग्लिश स्कूल परतूर चे सीबीएसई १० वित उज्ज्वल यश




**परतूर । प्रतिनिधी** - परतुर येथील विवेकानंद सेवा केंद्र संचलित विवेकानंद इंग्लिश स्कूल येथे दहावीच्या () बोर्ड परीक्षेत यश मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा नुकताच अतिशय उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात शरयू भांडवलकर हिने ९७% गुण घेऊन सर्व प्रथम क्रमांक मिळवला तर ध्रुव झंवर ९६.४०% गुण मिळवून द्वितीय क्रमांक मिळवला अदिती चव्हाण ९५.४०% सई बांडगे ९५.४०% गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळवला वेदांत नरवडे ९५% गुण मिळवून चतुर्थ तसेच ९०% च्या वर २२ विद्यार्थी ८०% च्या वर ५०% विद्यार्थी ६०% च्या वर८७विद्यार्थयांनी यश संपादन केले. प्रसंगी विद्यार्थ्यांचे पालकासमवेत सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून शाळेचे संस्थापक अध्यक्ष, संदीप दादा बाहेकर मुख्याध्यापक, भालचंद्र महाजन मुख्याध्यापक, विजयकुमार दंदाले. हे होते, तर प्रमुख पाहूणे विवेकानंद प्राथमिक तथा माध्यमिक शाळेच्या मुख्याध्यापिका, श्रीमती शिंदे मॅडम श्रीमती रोडगे मॅडम (गट समन्वयक अधिकारी परतुर) हे आवर्जून उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजनाने झाली.

मुख्याध्यापकांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे व शिक्षकांच्या कष्टाचे कौतुक केले आणि विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या. सत्कारमूर्ती पालकांपैकी प्रा.विनायक काळे, प्रा. वायकर यांनी आपल्या भावना व्यक्त करत यशाचे श्रेय गुरुजनांना दिले.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थाचालक यांनी सर्व गुणवंत विद्यार्थी यांचे अभिनंदन केले आणि त्यांच्या कठोर परिश्रमाचे कौतुक केले. ''विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकी ज्ञान न घेता व्यावहारिक ज्ञानही घ्यावे आणि भावी आयुष्यात जिद्द व चिकाटीने यश संपादन करावे,'' असे मार्गदर्शन त्यांनी केले. याप्रसंगी पालक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सोहळ्यामुळे इतर विद्यार्थ्यांनाही अभ्यासासाठी मोठी प्रेरणा मिळाली आहे. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी लक्ष्मण शिंदे आणि सर्व शिक्षक यांनी परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन, विष्णु बाहेकर. यांनी केले, तर आभार प्रदर्शन जगदीश बाहूटे यांनी केले.

# बेपत्ता कैलास पवारांची निघृण हत्या

## दरेगाव शिवारातील जंगलात आढळला मृतदेह

**जालना । प्रतिनिधी** - जालना शहरात एक धक्कादायक घटना उघडकीस आली असून, गेल्या तीन दिवसांपासून बेपत्ता असलेल्या एका व्यक्तीची निघृण हत्या करण्यात आल्याचे समोर आले आहे. कैलास दत्तू पवार (रा. हिंदीवाडी, पाण्याची टाकी परिसर, जालना) असे मृत व्यक्तीचे नाव असून, त्यांचा मृतदेह रविवारी दरेगाव शिवारातील वनविभागाच्या जंगलात रक्ताच्या थारोळ्यात आढळून आला. मिळालेल्या माहितीनुसार, कैलास पवार हे १७ एप्रिल रोजी दुपारी २ वाजेच्या सुमारास घरातून बाहेर पडले होते. त्यानंतर ते घरी परतलेच नाहीत. कुटुंबीयांनी त्यांची सर्वत्र शोधमोहीम राबवली, मात्र ते मिळून आले नाहीत. अखेर आज (१९ एप्रिल) दरेगाव शिवारात एका अनोळखी व्यक्तीचा मृतदेह असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. घटनास्थळी एक दुचाकी उभी होती, त्यावरून मृताची ओळख पटवण्यात आली. नातेवाईकांचा पोलीस ठाण्यात आक्रोश आणि गंभीर आरोपः कैलास पवार यांची हत्या झाल्याचे समजताच संतप्त नातेवाईकांनी जालना तालुका पोलीस ठाण्यात धाव घेतली. ''पूर्वीच्या वैमनस्यातून ही हत्या करण्यात आली असून, संशयित आरोपींनी माझ्या वडिलांना १६ तारखेलाच जीवे मारण्याची धमकी दिली होती,'' असा आरोप मृत कैलास पवार यांच्या मुलीने केला आहे. कुटुंबीयांनी काही संशयित आरोपींची नावेही पोलिसांना सांगितली आहेत. जोपर्यंत सर्व आरोपींना अटक केली जात नाही, तोपर्यंत मृतदेह ताब्यात घेणार नसल्याचा पवित्रा नातेवाईकांनी घेतला होता. यावेळी पोलीस ठाणे परिसरात नातेवाईकांनी मोठा आक्रोश केला. पोलिसांनी वेळीच तक्रार घेतली नाही आणि आरोपींना संरक्षण दिले, असा गंभीर आरोपही मुलीने केला आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.